**ठळक बातम्या**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, लोकसभेत १११ टक्के, तर राज्यसभेत १२१ टक्के विधायक कामाची नोंद

- राज्यातल्या २४  नगरपरिषदा, नगरपंचायतींसाठी उद्या मतदान

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांमध्ये महायुती म्हणून लढायची राष्ट्रवादी काँग्रेसची तयारी

- माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती द्यायला न्यायालयाचा नकार, वैद्यकीय कारणास्तव जामीन मंजूर

**आणि**

- नागपूरमध्ये पाण्याची टाकी कोसळून झालेल्या दुर्घटनेत ६ जण ठार

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. विकसित भारत जी राम जी विधेयक, शाश्वत अणुऊर्जा विकास विधेयक, सबका बिमा, सबकी रक्षा विधेयक, निरस्तीकरण आणि दुरुस्ती विधेयक इत्यादी महत्त्वाची विधेयकं संसदेनं या सत्रात मंजूर केली. तसंच, पुरवणी मागण्यांच्या पहिल्या टप्प्यात १ लाख ३२ हजार कोटी रुपयांच्या खर्चालाही संसदेनं हिरवा कंदील दाखवला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

*(हिवाळी अधिवेशनाच्या काळात लोकसभेच्या १५ बैठका झाल्या आणि १११ टक्के विधायक कामकाज झालं, अशी माहिती लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज संस्थगित करण्यापूर्वी दिली. राज्यसभेच्या कामकाजात काल वारंवार आलेल्या व्यत्ययाबद्दल अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी नाराजी व्यक्त केली आणि या वागणुकीची पुनरावृत्ती भविष्यात होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली. राज्यसभेत यंदा सुमारे ९२ तास कामकाज झालं आणि १२१ टक्के उत्पादकतेची नोंद झाली, असं राधाकृष्णन यांनी सांगितलं. १*

*डिसेंबरपासून सुरू झालेल्या या सत्रादरम्यान संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त विशेष चर्चा, तसंच निवडणूक सुधारणांवर चर्चा झाली.*

*मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्ध विरोधी पक्षांच्या खासदारांनी दाखल केलेल्या महाभियोगाच्या प्रस्तावावर विचार करू, असं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. ई-सिगरेट्सच्या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करायचं आश्वासनही त्यांनी दिलं.*

*या अधिवेशनात मंजूर झालेली विधेयकं कोट्यवधी नागरिकांचं जीवनमान उंचावण्यात आणि भारताला विकसित देश करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहर परिषदेत व्यक्त केला. जीरामजी विधेयकाबद्दल रिजिजू म्हणाले,*

***होल्ड… बाईट- किरेन रिजिजू***

*तर, हा कायदा आणून सरकार मजुरांकडून त्यांचे अधिकार काढून घेत आहे, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी वार्ताहर परिषदेत केला.*

***होल्ड… बाईट- जयराम रमेश***

*अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेसच्या प्रियांका गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि इतर नेत्यांनी सभापती ओम बिर्ला यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. तसंच संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री के. राम मोहन नायडू, राजीव रंजन सिंह, चिराग पासवान, प्रल्हाद जोशी यांनीही सभापतींची भेट घेतली.)*

**<><><><><>**

राज्यातल्या २४ नगर परिषदा आणि नगर पंचायती तसंच १५४ सदस्यपदांसाठी उद्या मतदान होणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून कर्मचारी मतदान केंद्रांवर पोहोचत आहेत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमुळे २ डिसेंबरला होणारं मतदान राज्य निवडणूक आयोगानं उद्यापर्यंत पुढे ढकललं होतं.

यवतमाळ, वाशीम, बारामती, अंबरनाथ, महाबळेश्वर, फलटण, कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी, नेवासा, फुरसुंगी- उरुळी देवाची, अनगर, मंगळवेढा, फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर, बसमत, अनंजनगाव सूर्जी, बाळापूर, देऊळगावराजा, देवळी, घुग्घूस या नगरपरिषदा आणि नगर पंचायतींसाठी हे मतदान होणार आहे. याशिवाय विविध जिल्ह्यातल्या ७६ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधल्या १५४ सदस्यपदांसाठीही उद्या मतदान होणार आहे. या सर्व

जागा तसंच २ डिसेंबरला मतदान झालेल्या ठिकाणांची एकत्रित मतमोजणी रविवारी होईल.

<><><><><>

राज्यातल्या २९ महानगरपालिकांमध्ये महायुती म्हणून लढायची आपली तयारी आहे, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज मांडली.

तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत निवडणूक लढायचा कोणताही प्रस्ताव नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यांचे समन्वयक, शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्षांबरोबर झालेल्या आढावा बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं तटकरे यांनी सांगितलं. महायुतीबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

पुणे महानगरपालिकेतल्या जागावाटपावर भाजपा आणि शिवसेना यांनी चर्चा सुरू केली आहे. गेल्या निवडणुकीत भाजपाने जिंकलेल्या जागा वगळता इतर जागांसंदर्भात चर्चा होणार आहे.

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ६०० पेक्षा जास्त इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. पक्षाकडे उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी कार्यालयात सकाळपासून मोठ्या प्रमाणात गर्दी होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून २५२ इच्छुकांनी काल मुलाखती दिल्या.

आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीने पुणे शहरासाठी उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. पुण्यात 'आप' स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहे.

धुळे महानगरपालिकेची निवडणूक महाविकास आघाडी एकत्र लढवणार आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसेनं ही निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय घेतला आहे. माजी आमदार अनिल गोटे आणि खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढली जाईल, अशी माहिती शिवसेनेचे संपर्क प्रमुख अशोक धात्रक यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. डॉक्टर दिनेश बच्छाव हे महाविकास आघाडीच्या निवडणूक समितीचे प्रमुख असतील. उमेदवार निवड आणि जागा वाटपासाठी एक सुकाणू समिती स्थापन केली जाणार आहे.

भाजपानं मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी समितीची घोषणा केली आहे. मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित साटम, माजी अध्यक्ष आशिष शेलार, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय सरचिटणीस विनोद तावडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह मुंबईतल्या विविध नेत्यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

सदनिका घोटाळ्याप्रकरणी राज्याचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. न्यायालयानं शिक्षेला स्थगिती दिली नसल्यानं त्यांची आमदारकी जाईल, अशी माहिती या प्रकरणातल्या वकील श्रद्धा दुबे-पाटील यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. मात्र वैद्यकीय कारणास्तव कोकाटे यांची अटक न्यायालयानं पुढे ढकलली आहे. त्यांना १ लाख रुपयाच्या जातमुचलक्यावर उच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला. दरम्यान, कोकाटे यांची आज अँजिओग्राफी झाली. त्यांना ४ ब्लॉकेज असून

त्यांच्यावर बायपास सर्जरी करणं गरजेची आहे. बायपास करायची नसेल तर अँजिओप्लास्टी करावी लागेल, अशी माहिती लीलावती रुग्णालयानं दिली.

<><><><><>

नागपूरमध्ये एका औद्योगिक केंद्रात पाण्याची टाकी कोसळून ६ जण ठार झाले आहेत. आज सकाळी साडेनऊच्या सुमाराला बुटीबोरी इथल्या औद्योगिक वसाहतीत ही दुर्घटना झाली. यात ३ जण जागीच मृत्यूमुखी पडले, तर उर्वरित तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

<><><><><>

विश्वचषक विजेत्या दृष्टिबाधित महिला टी-20 क्रिकेट संघातल्या खेळाडूंचा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज मुंबईत सत्कार केला. या खेळाडूंना आर्थिक सहाय्य, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असं आश्वासन त्यांनी दिलं. कर्णधार दीपिका टी.सी., उपकर्णधार गंगा कदम यांच्यासह संघातले खेळाडू यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

१९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ८ गडी राखून मात केली. श्रीलंकेनं ८ गडी गमावून दिलेलं १३८ धावांचं आव्हान भारतानं २ गड्यांच्या मोबदल्यात २ षटकं राखून पूर्ण केलं.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरु आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या एका षटकात बिनबाद ६ धावा झाल्या होत्या.

या मालिकेत भारत २-१ नं  आघाडीवर आहे. बुधवारी लखनौच्या एकाना स्टेडियमवर आयोदित चौथा टी-२० सामना धुक्यामुळे रद्द करावा लागला होता.

//<><><><><>//